## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सायकांळ)

जा.क्र. १०८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०२/२०१७

**१) संगनमत करुन शिविगाळ व मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक १०/०२/२०१७ चे २१.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी ही आरोपी क्र. १ चे घरी जावुन घराचे दारात उभी राहुन तीला तु माझे जावाई भरत झींगरे रा. घाटबोरी यांचे गाडीवर शेगळया विकण्यास जात जावु नको कारण गावातील लोक बदनामी वाचा तुमच्या दोघाबाबत बोलत आहेत हे चांगले वाटत नाही असे बोलली असता आरोपी क्र. १ ही फिर्यादीवर चिडून तिला जमीनीवर पाडले. व आरोपी क्र. २, ३ हया फिर्यादीचे अंगावर धावुन आल्या व फिर्यादीचे केस पकडुन लाथा बुक्यांने मारले व आरोपी क्र. १ हीने फिर्यादीचे तोंडावर बुक्की मारुन उजवी कडील दात पाडला. व फिर्यादीस मारपीट करीत असतांना आरोपी क्र. १ चा पती आरोपी क्र. ४ हा हातात दंडा घेवनु आला व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी व दंत चिकीत्सक यांचे अभिप्राय रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२५,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) सार्वजनीक ठिकाणी वाहन उभे ठेवुन रहदारीस अडथडा निर्माण झाल्याने गुन्हा नोंद . :–**

**अ)** दिनांक १३/०२/२०१७ चे १५.३० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील एमएच ३६/ ३८८३ चा चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर उभे ठेवुन येणाऱ्याा जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशी. वंजारी पो.स्टे. पालांदुर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १३/०२/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील एमएच ३६/ ३८९१ चा चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर उभे ठेवुन येणाऱ्याा जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशी. वंजारी पो.स्टे. पालांदुर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**३) शेताजवळ इसम मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–**

दिनाक १३/०२/२०१७ रोजी १५.०० वा. दरम्यान यातील मृतक पटवारी ईश्वर सतीबावने वय ३२ वर्ष, रा. भेंडाळा हा नेहमी प्रमाणे ०५.०० वा. फिरण्यास गेला असता तो मृत अवस्थेत राजु फुलबांधे यांचे शेताजवळ मिळुन आल्याने फिर्यादी ईश्वर सतीबावने वय २५ वर्ष, भेंडाळा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे १७४ कलम जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. रहागंडाले पो. स्टे. पवनी हे करीत आहे.

**४) नायलॉन दोरीने गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनाक १३/०२/२०१७ रोजी १३.०० वा. दरम्यान यातील मृतक रवीन्द्र बबन गराडे वय ३४ वर्ष, रा. वडेगाव याने आपले राहते घरी मयालीला नायलॉन दोरीने गळफास लावुन मरण पावला आहे. त्याला कोणीही नसुन त्याचे मरणास कोणावरही घातपाताचा संशय नाही अशा फिर्यादी प्रवीन बबन गराडे वय ३६ वर्ष, रा. वडेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे १७४ कलम जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. दिक्षीत पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९०४९००३३७२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.